# Code Of Conduct
# For
# Students

**महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर लक्षात ठेवावयाच्या बाबी:**

१. प्रवेश घेताना ३.५× २.५ सें.मी.आकाराचे दोन फोटो देऊन ओळखपत्र मिळवावे.महाविद्यालयात गणवेश व ओळखपत्र घालणे अनिवार्य आहे.

२. सूचना फलकावर दिलेल्या सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

३. जे विद्यार्थी शिष्यवृत्ती,फी माफीच्या सवलती अथवा आर्थिक सवलतीसाठी पात्र आहेत त्यांनी सूचना फलकावर जाहीर केल्यानुसार निर्देशित मुदतीच्या आत अर्ज कार्यालयात सादर करावे.

४. महाविद्यालयीन शुल्क ठराविक मुदतीच्या आत कार्यालयात जमा करावे.

५. ग्रंथालयाची पुस्तके काळजीपूर्वक वापरावीत व मुदतीचे आत परत करावीत अन्यथा दंड आकारण्यात येईल.

६. विस्तारकार्य,राष्ट्रीय सेवा योजना,खेळ व क्रीडा,राष्ट्रीय कार्यक्रम इ.कार्यक्रमात सहभाग घ्यावा.

७. महाविद्यालयात नियमांचे काटेकोरपणे पालन करणे व शिस्तीचे वागणे अनिवार्य आहे.

८. वर्गातील वेळापत्रकानुसार सर्वच तासिकांना उपस्थित राहावे.

९. विद्यार्थ्याने पत्र व्यवहाराकरीता प्रवेश अर्जावर पूर्ण पत्ता व मोबाईल नंबर लिहावा.ज्याद्वारे पत्रव्यवहार करता येईल.

**१०. महाविद्यालय परिसरामध्ये धुम्रपान,मद्यपान व पान तंबाखु सेवनावर बंदी आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला ५००/– रु.दंड आकारण्यात येईल.प्रसंगी प्रवेश रद्द करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.**

**११. महाविद्यालयीन परिसरात विद्यार्थ्यांना मोबाईल फोनचा वापर करता येणार नाही.तसे आढळल्यास ५०० /– रु.दंड आकारण्यात येईल.**

## महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याकरीता :

टीप – १. नागपूर विद्यापीठ अथवा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या व्यतिरीक्त अन्य संस्थेतून किंवा विद्यापीठातून पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यास रु.२००/– Immigration Fee म्हणून द्यावे लागेल.

२. विद्यापीठ संबंधित असणारे शुल्क यामध्ये विद्यापीठ नियमान्वये कोणत्याही प्रकारची वाढ झाल्यास ते शुल्क देणे विद्यार्थ्यासाठी बंधनकारक राहील.

३. बी.ए.भाग १ ते भाग ३ (ग्रामीण सेवा )पर्यंतच्या वर्गाचे वार्षिक शिक्षण शुल्क रु.८००/– राहील. समान दोन हफ्यात ४००/– रु. प्रति सत्र किंवा मासिक ८ समान हफ्यात १०० प्रमाणे करता येईल.

४. सवलत नसलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रवेश घेताना दयावा लागेल आणि उर्वरीत रक्कम विद्यार्थ्यांना माहे.ऑगस्ट पर्यत जमा करणे अनिवार्य राहील.

५. विद्यापीठ पर्यावरणशास्त्र शुल्क भाग – २ करीता विद्यापीठ नियमानुसार राहील.

६. इंग्रजी वाड्.मय व मराठी वाड्.मय या विषयाची फी रु.७५/– प्रति माह किंवा रु.७५०/– प्रति वर्ष प्रमाणे आकारण्यात येईल.

७. विद्यापीठ नामांकन फार्म शुल्क रु.१०/– प्रवेश घेतेवेळी दयावे लागेल.

८. वरील फी संरचनेत बदल होऊ शकतो.

## विद्यार्थी सहायता निधी :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार गरीब गरजु पात्र विद्यार्थीना,विद्यार्थी सहायता निधीतून आर्थिक साहय दिले जाते.

## शुल्क परत करण्यासंबंधी नियम :

१. प्रवेश घेताना भरलेले प्रवेश शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही.

२. सुरक्षा निधी खाली नमूद केले ल्या अटीनुसार परत केल्या जाईल.

अ) संस्था कायमची सोडून जाताना (इतर सर्व राशी भरली असल्यास )

ब) संस्था कायमची सोडल्यानंतर तीन वर्षाच्या आत सुरक्षा निधीची राशी परत मिळण्याबाबत अर्ज केल्यास (३ वर्षानंतर राशी मिळणार नाही.)

## कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :

प्रवेश घेण्यासाठी आवेदन पत्राद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे.आवेदन पत्र माहितीपत्रकासोबत जोडलेले असून महाविद्यालयाच्या कार्यालयात २०/– रु.मिळू शकेल.

१. विद्यार्थी पूर्वी शिकत असलेल्या संस्था प्रमुखाच्या सहिचा संस्था सोडल्याचा दाखला.(T.C.)

२. पात्रता परीक्षेची गुणपत्रिका

३. चारित्र्य प्रमाणपत्र

४. खेळ,क्रीडा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम,एन.सी.सी.,ए.सी.सी.स्कॉउट,ड्राईंग परीक्षा इ.प्रमाणपत्र

५. मध्यंतरी शिक्षणात खंड पडला असल्यास तसे (Gap Certificate )प्रमाणपत्र

६. (Attempt Certificate) आवश्यकता असल्यास

७. जातीचा दाखला झेरॉक्स प्रत

८. आधारकार्डची झरॉक्स प्रत.

## महाविद्यालयात प्रवेशसंबंधी सूचनाः

अ .अल्पसंख्याक दर्जा प्राप्त महाविद्यालयाच्या ठराविक प्रवेश नियमाप्रमाणे प्रवेश दिले जातील. निवड करतांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागा Reservation Position नुसार भरल्या जाईल.

ब. प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

क. प्रवेशित विद्यार्थ्यांनी निर्धारीत तारखेच्या आत निर्धारित केलेली राशी व अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या मूळ प्रती कार्यालयात सादर कराव्यात.निर्धारीत मुदतीच्याआत शुल्क व प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश रद्द समजण्यात येईल.

ड. प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या पालकाचा पत्ता असलेले दोन कोरे अंतर्देशीय पत्रे सादर करावेत. वरील पत्रे हे कमी उपस्थितीची पूर्व/अंतिम सूचना देण्यासाठी वापरण्यात येईल.

**टिप : मुळ प्रमाणपत्रे सादर करण्यापूर्वी त्यांच्या पुरेशा सत्यप्रती काढून विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ ठेवाव्या.मूळ प्रमाणपत्रे एकदा सादर केल्यानंतर ती विद्यार्थ्यांना परत दिली जाणार नाही.**

## कनिष्ठ,वरिष्ठ आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना लागू होणारे नियमः

अ. **ओळखपत्र :** महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे.हे ओळखपत्र ३.५ ग २.५ सें.मी.आकाराचे दोन फोटो कार्यालयात देऊन मिळवता येईल.महाविद्यालयात असताना दररोज हे ओळख पत्र प्रत्येक विद्यार्थ्यांना लावणे अनिवार्य आहे.मूळ ओळखपत्राची त्याऐवजी दुय्यम प्रत तयार करावयाची असल्यास २०/– शुल्क आकारण्यात येईल.

ब. **गणवेश :** सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाद्वारे निधारित गणवेशातच महाविद्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

मुले – निळी फुलपॅन्ट व पांढऱ्या निळया रेषांचे शर्ट

मुली – निळी सलवार,निंळी ओढणी,पांढऱ्या निळया रेषांचा कुर्ता.

क. **उपस्थिती –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ व नागपूर विद्यापीठ यांच्या नियमानुसार प्रत्येक विषयातील उपस्थितीचे प्रमाण कमीत कमी ७५ टक्के असणे आवश्यक आहे.

## महाविद्यालयाची वेळ :

महाविद्यालयाचे वर्ग एकच पाळीत चालविले जातात.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ महाविद्यालय | - | सकाळी ९.०० ते ४.०० पर्यंत |
| २. | कनिष्ठ महाविद्यालय | - | सकाळी ९.०० ते ४.०० पर्यंत |
| ३. | उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (H.S.C. Vocational / MCVC) | - | सकाळी ९.०० ते ४.०० पर्यंत |

## महाविद्यालयाची कार्यालयीन वेळ :

सुटीचा दिवस वगळता कार्यालय सकाळी ९.४५ ते ५.३० या कालावधीत सुरु असते.

## सूचना फलक:

प्रवेश शैक्षणिक शुल्क,शिष्यवृत्ती इतर सवलत,महाविद्यालयीन परीक्षा,बोर्ड व विद्यापीठ परीक्षा महाविद्यालयीन उपक्रम,स्पर्धा व अन्य बाबींसाठी पूर्ण माहीती सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते.प्रत्येक विद्यार्थ्याने सूचना फलकाकडे नियमितपणे लक्ष देणे आवश्यक आहे.कोणत्याही गोष्टी विषयी मला माहिती नव्हती, अशी सबब ऐकूण घेतली जाणार नाही.

## अनुशासन व आचारसंहिता:

१. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करावे व त्यांनी महाविद्यालयाचे अधिकारी,प्राध्यापक व कर्मचारीवर्ग यांच्याशी आदरपूर्वक व सभ्यतेची वागणूक ठेवावी.

२. महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपर्वक वापरावी,हेतुपरस्पर मालमत्तेची हानी करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. असे आढळल्यास त्याकरीता दंड आकारण्यात येईल.

३. महाविद्यालयातर्फे आयोजित विविध कार्यक्रमात व उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घ्यावा.

४. विद्यार्थ्यांनी तास सुरु होण्यापूर्वी वर्गात उपस्थित राहावे.

५. महाविद्यालयात वेळोवेळी श्रमसंस्कार कार्यक्रम आयोजित केले जातात.त्यात प्रत्येक विद्यार्थ्याला भाग घ्यावा लागेल.

६. विद्यार्थ्यांना दररोज प्रत्येक विषयाच्या तासिकेला हजर राहणे बंधनकारक आहे.त्याचप्रमाणे प्रत्येक विषयाची ७५ टक्के उपस्थिती असणे बंधनकारक आहे.अन्यथा परीक्षेला बसता येणार नाही व त्याला कोणत्याही शैक्षणिक सवलतीचा लाभ मिळणार नाही.

७. महाविद्यालयीन शिस्तीचे पालन न करणे,महाविद्यालयाचे मालमत्तेस नुकसान पोहचविणे,असभ्य वर्तन करणे, सतत अनुपस्थित असणे,खोटी प्रमाणपत्रे सादर करणे,इ.बाबीं करीता विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे. याबाबतीत प्राचार्यांचा निर्णय अंतिम स्वरुपाचा व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

८. महाविद्यालयात ओळखपत्राशिवाय उपस्थित राहता येणार नाही.

९. जे विद्यार्थी तासिकेला अनुपस्थित राहतील त्यांना प्रत्येक तासिकेला १/– रु.प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१०. पालकांना आपल्या पाल्यांबाबत किंवा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाशी संपर्क साधावयाचा असल्यास ०७१५२ – २३०५१८, २३०११० या दूरध्वनी क्रमांकावर महाविद्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

११. सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन गणवेशात यावे तसेच ओळखपत्र लावून यावे.